# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:21.04.2026** **वार: मंगळवार**

---

1. संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यात उच्चस्तरीय बैठक, पाण्याचं सुयोग्य नियोजन करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
2. महिला आरक्षणासंदर्भातील विधेयकाच्या समर्थनार्थ राज्यात एक कोटी महिलांची स्वाक्षरी मोहीम राबवणार असल्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
3. हे विधेयक महिला आरक्षणासाठी नाही तर लोकसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेसाठी होतं, असा विरोधकांचा दावा आणि
4. जम्मू आणि काश्मीरमधे बस दरीत कोसळल्यानं 21 जणांचा मृत्यू, 29 जण जखमी

**<u>मुख्यमंत्री</u>**

संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर पाण्याचं सुयोग्य नियोजन करावं, जलसंधारणाच्या कामांना गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिले. संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत उच्चस्तरीय बैठक झाली. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषि, वित्त आणि नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. योग्य नियोजन केलं तर राज्याला या परिस्थितीचा सक्षमपणे सामना करता येईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. जलसिंचनाच्या माध्यमातून पिकांचं नुकसान कमी करता येतं. त्यामुळे जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार या योजनांची कामं तातडीनं पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. जी रामजी मधून जास्तीत जास्त कामे मिळविण्यासाठी कृतिदल तयार करावं, पशुधनासाठी चारा टंचाई होऊ नये यासाठी वैरण विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत, पाण्याचा काटेकोर वापर आणि साठवणूक सुनिश्चित करावी, असे निर्देशही फडणवीस यांनी यावेळी दिले.

दुबार पेरणीची वेळ आली तर बियाण्यांचा अतिरिक्त पुरवठा करण्यासाठी संबंधित संस्थांना सज्ज राहण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचं कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी यावेळी सांगितलं.

**<u>भरणे</u>**

यंदाच्या खरीप हंगामाच्या नियोजनसंदर्भात पुण्यात काल राज्यस्तरीय कार्यशाळा झाली. एल निनोच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगामासाठी सूक्ष्म नियोजनावर भर द्यावा, असे निर्देश कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यांनी यावेळी दिले. शेतकऱ्यांना खते-बियाणे वेळेत आणि पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन देण्याच्या सूचनाही कृषीमंत्र्यांनी दिल्या.

**<u>बावनकुळे</u>**

राज्यातल्या संभाव्य दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शासनानं व्यापक उपाययोजना आखण्यास सुरुवात केल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते काल नागपूर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते.

**<u>स्वाक्षरी मोहीम</u>**

महिला आरक्षणासंदर्भात 131व्या घटना दुरूस्ती विधेयकाला पाठिंबा मिळवण्यासाठी स्वाक्षरी मोहीम राबवणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. राज्यातल्या एक कोटी महिलांच्या स्वाक्षऱ्या गोळा करणार असून यासाठी तालुकास्तरापर्यंत जनजागृती करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. याबाबत आपली भूमिका विशद करताना मुख्यमंत्री म्हणाले.....

**या संदर्भात जनमत एकत्रित करण्याचं काम करू, महिलांना संघटित करण्याचं काम करू. महाराष्ट्रातनं एक कोटी महिलांच्या सह्या या आम्ही गोळा करणार आहोत. या बिलाच्या समर्थनार्थ त्यासोबत तालुका स्तरापर्यंत मोठ्या प्रमाणात जनजागृती करणार आहोत.**

यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे, मुंबईच्या महापौर रितू तावडे उपस्थित होत्या.

**<u>सुप्रिया सुळे</u>**

दरम्यान, खासदार सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आरोप फेटाळून लावले. नारी शक्ती वंदन विधेयक 2023 मधेच संसदेत एकमतानं मंजूर झालं आहे, आताचं विधेयक हे महिला आरक्षण नाही तर लोकसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेचं विधेयक होतं, असं त्या म्हणाल्या.....

**नारी शक्ती वंदन अभिनियम हे बिल युनॅनिमसली एक मताने पार्लमेंट ने पास केलेलं आहे. त्याची अंमलबजावणी दोन हजार चोवीस च्या लोकसभेत करणं आम्हाला अपेक्षित होतं आणि आज, आजही मी विनम्र विनंती करते जी आम्ही अलरेडी पार्लमेंट मध्ये फ्लोर ओएफ ठे हाउस वर केलेली आहे ऑफिशियली पार्लमेंट मध्ये की ह्या क्षणी तुम्ही याचं इम्प्लिमेंटेशन करा. पाचशे त्रेचाळीस मधल्या तेहेतीस टक्के महिलांना आरक्षण तुम्ही लगेच द्या.**

खासदार प्रणिती शिंदे आणि खासदार शोभा बच्छाव यांनीही काल मुंबईत पत्रकार परिषद घेतली. महिला आरक्षणावर खुल्या चर्चेसाठी काँग्रेस पक्ष तयार असल्याचं प्रणिती शिंदे यांनी सांगितलं. तर महिला आरक्षण विधेयक 2023 मध्येच मंजूर झालं असून, सध्याच्या लोकसभेच्या जागांमधूनच महिला आरक्षण द्या, अशी मागणी बच्छाव यांनी केली.

**<u>कार्यशाळा</u>**

माध्यमांनी केवळ माहिती देण्यापुरतं मर्यादित न राहता समाजमत घडवण्याची जबाबदारी पार पाडावी आणि महिलांविषयीचं वृत्तांकन करताना संवेदनशीलता आणि कायदेशीर अचूकता राखावी, असं प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केलं. राष्ट्रीय महिला आयोग आणि राज्य शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयानं ‘महिला, माध्यमं आणि तंत्रज्ञान’ या विषयावर काल मुंबईत एका कार्यशाळेचं आयोजन केलं होतं; त्यामध्ये त्या बोलत होत्या. लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये पीडितेची अनावश्यक वैयक्तिक माहिती देणं किंवा तिची ओळख उघड होईल अशी माहिती प्रकाशित करणं कटाक्षानं टाळायला हवं, असं राहटकर म्हणाल्या.

नाशिकमधील कथित धर्मांतर प्रकरणाच्या तपासासाठी एक समिती नेमण्यात आल्याचं सांगून त्या म्हणाल्या.....

**ही जी फॅक्ट फाइंडिंग कमिटी आहे, ही कमिटी हाय कोर्टाच्या पूर्व न्यायाधीश त्यासोबत एका राज्याचे पूर्व पोलीस महासंचालक आणि सुप्रीम कोर्टाच्या वरिष्ठ एडव्होकेट या तिघांना घेऊन अशी ही कमिटी बनवलेली आहे. आणि या कमिटी चा दौरा गेल्या दोन दिवसांपासून नाशिकमध्ये सुरू आहे. मी त्यांना येणाऱ्या दहा दिवसामध्ये या कमिटी चा जो प्राथमिक रिपोर्ट आहे हा प्राथमिक रिपोर्ट आयोगापुढं सादर करायला सांगितलेला आहे.**

**<u>बालकक्ष</u>**

लहान मुलांशी संबंधित तक्रारींचं निवारण करण्यासाठी राज्यातल्या प्रत्येक पोलीस ठाण्यात विशेष बाल पोलीस पथक कक्ष स्थापन करण्याच्या सूचना राज्य बालहक्क आयोगाने दिल्या आहेत. राज्यभरातले पोलीस आयुक्त आणि पोलीस अधिक्षकांना या सूचना लागू आहेत.

**<u>अहिल्यानगर</u>**

बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठीचा प्रचार आज संध्याकाळी संपणार आहे. बारामतीमध्ये आज प्रचाराची सांगता सभा होणार आहे. राहुरीमध्ये काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या समर्थनार्थ प्रचार सभा घेतली. राहुरीमध्ये नवीन एमआयडीसी तयार करून या भागातील तरुणांना उद्योग आणि रोजगार दिला जाईल असं आश्वासन फडणवीस यांनी दिलं.

**प्रकाशन**

देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या व्यक्तिमत्वातील विविध पैलूंचं दर्शन घडवणाऱ्या विविध लेखांचं संकलन असलेल्या 'भारताची प्रतिभा' या पुस्तकाचं प्रकाशन उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पुण्यात झालं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला स्वतः प्रतिभताई पाटील, कुलगुरू सुरेश गोसावी उपस्थित होते.

**परवाने**

पॉस प्रणाली आणि प्रत्यक्षात असलेल्या युरिया साठ्यामध्ये तफावत आढळल्यानं पुणे जिल्ह्यातील 15 कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी ही माहिती दिली आहे. निलंबित केलेल्या विक्रेत्यांकडून शेतकऱ्यांनी खत घेऊ नये असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

**रद्द**

धाराशिव जिल्ह्यातही एक कृषी सेवा केंद्र कायमस्वरूपी रद्द करण्यात आलं असून चौदा कृषी सेवा केंद्राचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

**गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यात दुर्मिळ पक्ष्यांची शिकार करणाऱ्या टोळीला वन अधिकाऱ्यांनी अटक केली आहे. 12 जणांच्या या टोळीकडून काही पक्षी आणि पक्ष्यांचे अवयव ताब्यात घेण्यात आले. हे शिकारी जंगलात लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर वनकर्मचाऱ्यांनी ही कार्यवाही केली.

**अपघात**

जम्मू आणि काश्मीरमध्ये उधमपूर जिल्ह्यात काल एका प्रवासी बसला भीषण अपघात झाला; या अपघातात 21 जणांचा मृत्यू झाला तर 29 जण जखमी झाले. चालकाचं नियंत्रण सुटल्यानं ही बस खोल दरीत कोसळली. या दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना तसंच जखमींना केंद्र आणि राज्य शासनानं मदत जाहीर केली आहे.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पुढचे दोन दिवस मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कोकण वगळता उर्वरित भागात गारपीट होण्याचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**